जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 APR 2018
महाराष्ट्र टाईम्स

# प्रा. रेश्मा सनदी यांना पीएचडी


रेश्मा सनदी

कोल्हापूरः रेश्मा अस्लम सनदी यांना प्राणीशास्त्र विषयात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतून शिवाजी विद्यापीठाने पीएचडी पदवी जाहीर केली. सनदी यांनी रेशीमशेतीशी निगडीत व रेशीम उत्पादन आणि उद्योगाच्या अनुषंगाने असणारे आरोग्यविषयक समस्या याविषयी काम केले आहे. 'ऑक्युपेशनल हेल्थ हर्जाड्स इन सेरीकल्चर वर्कर्स विथ् रेफरन्स् टू इरगॉनामिक्स' या विषयावर त्यांनी शोधप्रबंध सादर केला. प्राणीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. पी. डी. राऊत, डॉ. शांताकुमार, डॉ. मिलिंद गुरजे यांचे मार्गदर्शन लाभले. त्या इचलकरंजी येथील दत्ताजीराव कदम महाविद्यालयात कार्यरत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 APR 2018
महाराष्ट्र टाईम्स



डॉ. तुषार घाटगे, जयसिंगपूर

शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 APR 2018
Times of India

# Mahavir College to host national seminar tomorrow

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Mahavir College will host a national seminar on understanding college administrative work culture in the present context on Tuesday.

"The administrative block of the college plays a very pivotal role. Moreover, the academic pursuit becomes meaningful with the proper support of administrative work culture," a college official said.

"With the changing scenario in higher education, every aspect of the academic world has been greatly influenced and thereby the entire system has undergone rapid transition to cope with the new situation," said an official from the college.

CAMPUS BUZZ

The official added that along with new changes in the higher education, the office work culture is changing with the course of time. The office staff in colleges are perplexed by the new changes. So it is a crucial time to think about modernisation and digitalisation of office very seriously and sort out the issues that are creating hurdles.

"The present national seminar will focus on these issues and provide concrete solutions for the betterment of the stake holders. We hope it will facilitate to enhance the efficiency of administrative staff," said the official.

Representaional image



Around 118 students were rejected in the first round of the admission process due to submission of invalid documents

**Carry valid documents for RTE admissions:** The district primary education department has asked all the parents, who have been called for their wards' admission in the second round of the Right to Education (RTE) admission process, to carry valid documents for the whole process.

According to the officials, as many as 118 students were rejected in the first round of the admission process due to submission of invalid documents.

The parents must make sure all the documents listed for the admission process are valid and genuine, said an official.

23 APR 2018 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘एमएचटी-सीईटी’च्या ऑनलाईन ‘वेबिनार’ला प्रतिसाद

प्रतिनिधी

कोल्हापूर

राज्याच्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे ‘एमएचटी-सीईटी २०१८’ व अभियांत्रिकी, फार्मसी व कृषी शिक्षणामधील संधी’ या विषयावर महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालयाच्या वतीने राज्यभर मार्गदर्शक वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. कोल्हापूरमधील शिवाजी विद्यापीठातील तंत्रशिक्षण अधिविभाग, डी. वाय. पाटील विद्यापीठ व भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी येथे विद्यार्थ्यांना ऑनलाईन मार्गदर्शन करण्यात आले. या वेबिनारला विद्यार्थी व पालकांनी उत्स्फुर्तपणे प्रतिसाद देत मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवली.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालयाच्या वतीने आयोजित वेबिनारमध्ये १० मे रोजी होणाऱ्या ‘एमएचटी-सीईटी २०१८’ बद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. अभियांत्रिकी, फार्मसी आणि कृषी विभागात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित आणि जीवशास्त्र या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. जयदिप बागी, पी. ए. प्रभू प्रा. डी. एम. नांगरे, डी. वाय. पाटील विद्यापीठात प्राचार्य डॉ. ए. एन. जाधव, डॉ. राहूल पाटील, डॉ. ए. एस. गुप्ता यांनी आयोजन केले होते.